Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-17, Issue-11(A)| November- 2025

Original Article

# साहित्य,समाज आणि संस्कृती

**संतोष उध्दव पवार**
संशोधक विद्यार्थी
**Email:** pawarsant8987@gmail.com

**Manuscript ID**:
JRD -2025-171135
ISSN: 2230-9578
Volume 17
Issue 11(A)
Pp. 190-193
November. 2025

**Submitted:** 18 Oct. 2025
**Revised:** 28 Oct. 2025
**Accepted:** 11 Nov. 2025
**Published:** 30 Nov. 2025

***सारांश***

*साहित्य, समाज आणि संस्कृती हे एकमेकांशी अतूटपणे जोडलेले घटक आहेत. समाजातील जीवनमूल्ये, परंपरा, विचारधारा व बदलते वास्तव साहित्याच्या माध्यमातून अभिव्यक्त होत असते. साहित्य समाजाचे प्रतिबिंब असून ते संस्कृतीचे जतन, संवर्धन व परिवर्तन घडवून आणण्याचे कार्य करते. समाजातील सामाजिक, आर्थिक, राजकीय व सांस्कृतिक घडामोडी साहित्यनिर्मितीवर प्रभाव टाकतात, तर साहित्य समाजप्रबोधन व वैचारिक जागृतीस चालना देते. त्यामुळे साहित्य, समाज आणि संस्कृती यांचे परस्परसंबंध समजून घेणे अत्यंत महत्त्वाचे ठरते.*

***मुख्य शब्द :*** *साहित्य, समाज, संस्कृती, सामाजिक वास्तव, परंपरा, मूल्यव्यवस्था, सामाजिक परिवर्तन, सांस्कृतिक जाणीव, वैचारिक प्रबोधन*

## प्रस्तावना

'मानवी जीवन' हा साहित्याचा विषय आणि 'भाषा' हे साहित्याचे माध्यम आहे. मानवी जीवन आणि भाषा या दोन्ही गोष्टी समाजाधिष्ठित आहेत. समाजातील समाज घटकाकडे त्या - त्या समाजातील संस्कृतीचा ठेवा असतो. हा संस्कृतीचा ठेवा साहित्यात भाषेच्या माध्यमातून प्रकट केला जातो. 'साहित्य' हे वाचक श्रोते व प्रेक्षक यांच्याकरीता निर्माण केले जाते. 'साहित्यिक' हा देखील समाजाचाच एक घटक असतो. साहित्य निर्मितीने त्याला समाधान, संपत्ती व किर्ती प्राप्त होते. या सर्वच गोष्टीत साहित्याचा समाजाशी असलेला संबंध आपल्याला पहावयास मिळतो. समाजात ज्या काही घटना घडलेल्या असतात त्याचं प्रतिबिंब साहित्यामध्ये पहावयास मिळते. कादंबरी, कथा, नाटक व काव्य या सर्व साहित्यात आपल्याला समाजातील मूल्यांचे दर्शन पहावयास मिळते. साहित्य हे मानवी जीवनाचे प्रतिबिंब आहे. साहित्य हा समाजाचा आरसा आहे. संस्कृती ही विविध लोकसमुदायाची सुजीवन पद्धती आहे. अशी विविध मते आपण ऐकतो. साहित्य, समाज आणि संस्कृती हे एकमेकांना परस्पर पूरक घटक आहेत. या साहित्य, समाज व संस्कृतीचा एकमेकांमध्ये सहसंबंध आढळतो. समाज व संस्कृतीचा तर साहित्यावर प्रचंड प्रभाव असल्याचे पहावयास मिळते.

## साहित्य, समाज आणि संस्कृती

कला समाज आणि संस्कृती यांच्या अभ्यासाचे 'साहित्य' हे महत्त्वाचे माध्यम आहे तर साहित्य, समाज आणि संस्कृती यांचे अत्यंत घनिष्ठ संबंध असून ते परस्परांना पूरक असतात. " साहित्यनिर्मिती हा मानवाच्या सामाजिक जीवनातील सांस्कृतिक उपक्रम आहे, तसेच तो संस्कृतीचा एक घटकही आहे. विवाह संस्थेपासून राज्यसंस्थेपर्यंत सर्व सामाजिक संस्था या संस्थांच्या लिखित, अलिखित नियमातून निर्माण झालेल्या चालीरीती, रूढी, परंपरा आणि रिवाज तसेच कला आणि साहित्य हे संस्कृतीचे चार घटक आहेत.

*Creative Commons (CC BY-NC-SA 4.0)*
*This is an open access journal, and articles are distributed under the terms of the Creative Commons Attribution-NonCommercial-ShareAlike 4.0 International Public License, which allows others to remix, tweak, and build upon the work noncommercially, as long as appropriate credit is given and the new creations ae licensed under the idential terms.*

**Address for correspondence:**
*संतोष उध्दव पवार, संशोधक विद्यार्थी*

**How to cite this article:**
*पवार, . संतोष . उध्दव . (2025). साहित्य,समाज आणि संस्कृती. Journal of Research and Development, 11(A), 190–193. https://doi.org/10.5281/zenodo.18113572*

Quick Response Code:
Website: https://jrdrvb.org/
DOI: 10.5281/zenodo.18113572
OPEN ACCESS

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-17, Issue-11(A)| November- 2025

या चार घटकांनी मिळून 'संस्कृती' ही लघुसंज्ञा परिचित झालेली आहे. जेव्हा आपण संस्कृती आणि समाज असे म्हणतो तेव्हा आपल्याला 'लोकांचे वर्तन' अभिप्रेत असते. समाज हा ओळखता येण्यासारखा 'लोकसमुदाय' असतो. तो आदिम समाज, भटका विमुक्त समाज, खेड्यातील कृषी जीवनाशी निगडित ग्रामीण समाज अथवा आधुनिक समाजा असेल पण 'समाज' म्हणजे एकाअर्थी ' परिमित लोकांची संस्था' असते . आणि संस्कृती म्हणजे विविक्षीत लोकसमुदायाच्या अथवा समाजाच्या जीवनाची विविक्षीत पद्धती असते. या जीवन पद्धतीत कला आणि साहित्य यांना अविभाज्य आणि अपरिहार्य असे स्थान आहे."१ साहित्यकृतीची निर्मिती ही लेखकाची व्यक्तिनिष्ठ निर्मिती असली तरी त्याला त्याच्या समाज जीवनातून आणि सांस्कृतिक वातावरणातून साहित्य निर्मितीच्या प्रेरणा व स्त्रोत मिळत असतात.

**साहित्य**

संस्कृत साहित्यिकांनी काव्याच्या / साहित्याच्या केलेल्या व्याख्येवरून असे म्हणता येते की, 'साहित्य' हा शब्द संस्कृत वाङ्मयात 'ललित वाङ्मय' या अर्थाने उपयोगात आणलेला आहे. वाङ्मय, सारस्वत ही साहित्याची पर्यायी संज्ञा आहेत.

साहित्य म्हणजे असे लेखन की ज्यात शब्दार्थांना एक रमणीय अर्थ असतो. भाव, कल्पना, विचार, शैली इत्यांदीपासून हे रमणीयत्व, लालित्य आलेले आपणास पहावयास मिळते. त्यामुळे हे लेखन लक्षणीय बनते. वाचकांना त्याच्या आस्वादातून एक प्रकाराचा आनंदप्रत्यय येत असतो. काव्य, कथा, कादंबरी, नाटक यांचा समावेश साहित्यातच असतो. साहित्य ही एका व्यक्तिमत्वाची नवनिर्मिती असते. लेखक, कवी, आपली अनुभूती, आपले अनुभव विश्व साहित्यातून व्यक्त करत असतो, 'साहित्य' ही एक शक्ती आहे. मनासंबंधीच्या अनुभवातून एक मन तिची निर्मिती करते आणि अनेक मने तिचा आस्वाद घेतात. साहित्य शब्दांमधून साकार होत असते. शब्द अनुभव प्रकट करतात. अनुभव अनेक मुल्यदर्शी भावघटकांनी संघटित होतो. यावरून लक्षात येते की, साहित्यकृतीमधील अनुभूती लेखकाने समाजतून घेतलेली असते. त्यामुळे लेखकाची 'अनुभवसृष्टी' म्हणून जी संकल्पना मान्य केली जाते तिच्यावर समाज आणि संस्कृती यांचा प्रभाव दिसून येतो.

**समाज**

" एका समाज उद्दिष्टांसाठी एका विशिष्ट भूभागावर राहणा-या व्यक्तीचा समुदाय म्हणजे 'समाज' होय."२ निव्वळ लोक एकत्रित आले म्हणजे समाज बनत नाही. समाज बनण्यासाठी त्या लोकांमध्ये संबंधाची व्यवस्था असली पाहिजे. समाज एका विशिष्ट भूभागावर वसलेला असतो. समाज स्थायी असतो, त्यात निरंतरता असते. समाजातील सदस्यांमध्ये आपलेपणाची भावना असते. समाजाची वैशिष्ट्यपूर्ण जीवन पद्धती असते. पुराणात समाजाचा उल्लेख 'समाज म्हणजे उत्सव ' असा आढळतो. प्रत्येक समाजाची धारणा, त्यामागील रचनातत्त्वे वेगवेगळी असतात. धर्मसंकल्पना, रूढी, तत्वप्रणाली, आचार, विचार, दृष्टिकोन, संकेत, शिष्टाचार नीतीकल्पना इ. विशेष स्वतंत्र वा वेगळे असतात. त्या सर्वांवरच त्या-त्या समाजाची संस्कृती निश्चित होत असते. यावरून साहित्य हे जसे मानव्यसापेक्ष आहे तसाच मानव हा समाजसापेक्ष आहे आणि समाज हा संस्कृतीसापेक्ष आहे हे जर आपण मान्य करणार असू तर साहित्य आणि समाज यांच्यातील मूलभूत संबंध कोणालाच नाकारता येणार नाही. साहित्य हे जसे एकजिनसी नसते, तसाच समाजही एकजिनसी नसतो. समाजात सत्ताधारी, धनिक, पांढरपेशा, श्रमजीवी, दलित इ. विविध वर्ग असतात. " साहित्यिक ज्या वर्गात जन्मतो व लहानाचा मोठा होता त्या वर्गाचे संस्कार घेऊनच तो साहित्य निर्माण करीत असतो. त्याची वैचारिक भूमिका, विचारपद्धती व विचाराची धाव या संस्कारांनी निश्चित होत असते. त्याने समाजातील स्वेतर वर्गाची दखल घेतली तरी ती तो स्वतःच्या वर्गीय दृष्टिकोणातूनच घेत असतो. त्याचे साहित्य हे मुख्यतः समसंस्कारी वाचकाकरिताच असते. म्हणजे साहित्यात समाजाची विचारप्रणाली वा स्वप्ने व्यक्त झाली, तर ती सर्व समाजाची नसून एका विशिष्ट वर्गाचीच असतात."३

**संस्कृती**

केवळ मानव हाच 'संस्कृती' असणारा भूतलावरील एकमेव प्राणी आहे. संस्कृती ही मानवाने स्वतः निर्माण केलेली आहे. 'संस्कृती' हा शब्द ' कल्चर ' या शब्दाच्या प्रतिशब्द म्हणून रूढ झाला आहे. 'संस्कार' आणि 'संस्कृती' हे दोन्ही सम + कृ या एकाच धातुपासून बनले आहे. त्यांचा अर्थही व्याकरणीकदृष्ट्या एकच आहे. पण संस्कार हा शब्द धार्मिक क्षेत्रापुरताच मर्यादीत राहिला. धर्मासह समग्र अंतर्बाह्य जीवनाच्या उन्नत अवस्थेसाठी 'संस्कृती' हा शब्द वापरला जातो. भौगोलिक परिस्थितीशी समायोजन करताना मिळविलेले ज्ञान, निर्माण केलेल्या अनेक भौतिक गोष्टी, समायोजनाच्या प्रक्रियेत आलेले अनुभव त्यातून साकार झालेल्या चांगल्या वाईटाच्या अनेक योग्यायोग्यतेच्या कल्पना म्हणजे मूल्ये या सर्वांचा संच म्हणजे संस्कृती. हे सर्व लक्षात घेऊन एडवर्ड टायलरने संस्कृतीची पुढील व्याख्या केली. " समाजाचा सदस्य या नात्याने समाजात राहून माणसाने हस्तगत केलेले ज्ञान विज्ञान आणि कला; त्यांच्या जोरावर परिस्थितीशी समायोजन करून मिळविलेले कौशल्य व क्षमता, तसेच नीतिमत्ता, कायदा, रूढी ह्यांना अनुसरून केले जाणारे वर्तन यांचा संच म्हणजे संस्कृती होय "४. मानवी समुदायाला अशी संस्कृती असते. ज्ञान, अनुभव, मूल्ये, परिस्थिती आणि समायोजन यांच्या भिन्नतेमुळे प्रत्येक मानवसमूहाची संस्कृती भिन्न असते. प्रत्येक मानवसमूह हा दुसऱ्या समूहापासून स्वतंत्र असतो. समग्र समाज हा मोठा मानवी समूह

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-17, Issue-11(A)| November- 2025

असतो आणि तदंतर्गत लहान -लहान उपसमूह असतात. मोठ्या समाजाची अथवा समूहाची संस्कृती असते तशीच प्रत्येक उपसमूहाची सुद्धा स्वतंत्र संस्कृती असू शकते. उदा. आदिवासी हा एक उपसमूह आहे, भटक्या विमुक्त जमाती हा उपसमूह आहे. दोन्ही उपसमूह एकमेकांपासून स्वतंत्र आहेत.

लहान मूल वाढत जाते. त्याचे शैशवात रूपांतर होऊन पुढील अवस्थांतरातून वाढ होत मृत्यूपर्यंत समाज कमीअधिक परिणामकारक रितीने आणि वेगवेगळ्या मार्गांनी त्याला शिक्षण देत असतो. समाजिक जीवनाच्या विभिन्न परिस्थितीत जगण्यासाठी आवश्यक अशा वर्तनाचे आकृतिबंध (Patterns of behavi- ours) समाज माणसाला शिकवीत असतो. हा सामाजिक वारसा एका पिढीकडून दुसऱ्या पिढीकडे जातो तेव्हा संस्कृतीचेही एका पिढीकडून दुसऱ्यापिढीकडे सतत संक्रमण होत असते. मानवी उपसमूहातील अथवा समाजासमाजातील संपर्क वाढला की सांस्कृतिक देवाणघेवाणाची प्रक्रिया सुरू होते. सांस्कृतिक परिवर्तन घडून येते. आदिम जमातीपासून ते विकसित उद्योगप्रधान देशापर्यंत सांस्कृतिक परिवर्तनाचे अनुभव हे मानवी समाजाचे मोठे संचित आहे.

संस्कृती ही शिकूनच प्राप्त होते. संस्कृतीत सामावलेल्या कोणत्याही गोष्टीचे ज्ञान उपजत नसते. संस्कृतीचा वारसा पूर्वजांकडून मिळतो. परंतु प्रत्येक पिढी तेवढ्यावरच समाधान मानीत नाही. परिस्थितीशी समायोजन करताना व चिकित्सक बुद्धीने निर्माण केलेल्या प्रश्नांची उत्तरे शोधताना प्रत्येक पिढीला नवीन अनुभव येतात. नवनवीन संस्कृतीची निर्मिती होते. मूळ संस्कृतीत भर पडते. या प्रक्रियेमुळेच मानवी संस्कृतीचा सतत विस्तार होत आला आहे.

मानवी समाजात संस्कृतीचे महत्त्व आहे. संस्कृती जोपासावी लागते. जोपासतानाच तिचे संवर्धन होते. साहित्य हे संस्कृतीची जोपासना करण्याचं, संस्कृतीचं रक्षण करण्याचे आणि संवर्धन करण्याचं कार्य करीत असते.

**साहित्य, समाज आणि संस्कृतीचा सहसंबंध :-**

जीवन हा साहित्याचा विषय आणि भाषा हे साहित्याचे माध्यम आहे. जीवन व भाषा या दोन्ही गोष्टी समाजधिष्ठित आहेत, तर प्रत्येक समाजाजवळ एक संस्कृतीचा ठेवा असतो. शिवाय 'साहित्य' हे वाचक, श्रोते वा प्रेक्षक यांच्याकरीता निर्माण होते आणि 'साहित्यिक' हा समाजाचा एक घटक असून साहित्यनिर्मीतीने त्याला समाधान, संपत्ती व किर्ती प्राप्त होते. या सर्वच गोष्टीत साहित्याचा समाजाशी असलेला संबंधच दिसून येतो. साहित्याचे समाजावर व समाजाचे साहित्यावर बरे-वाईट परिणाम होत असतात. त्याचे एक कारण असे देता येते की, लेखक, वाचक, आणि भाषा हे साहित्यकृतीच्या संदर्भात लक्षात घ्यायला हवेत. हे तिन्ही घटक 'सामाजिक' म्हणून एकच कारण असे देता येते की, लेखक, वाचक, आणि भाषा हे साहित्यकृतींच्या संदर्भात लक्षात घ्यायला हवेत असे तिन्ही घटक 'सामाजिक' म्हणून अशा एक वस्तुचेच भाग असतात. त्यामुळेच साहित्याला एक सामाजिक परिणाम प्राप्त होत असते. त्यामुळेच तेथे कलात्मकतेबरोबरच सामाजिकतेचा विचारही महत्वाचा ठरतो.

" लेखक ही निर्मितीक्षम कलावंत असला तरी, तो नेहमीच एका विशिष्ट समाजाचा घटक असतो. व्यक्ती आणि समाज यांच्या संबंधाबाबतचे सर्व प्रश्न त्याच्याही बाबतीत उपस्थित होत असतात. त्याच्या कृती – उक्तीला नेहमीच एक सामाजिक परिणाम असते. व्यक्तीचे एकलेपण आणि सामाजिकता यातही एक गुढ संबंध असतो. त्यातील प्रश्नांची सोडवणूक साध्या, सरळ नियमांनी करता येत नाही हे खरे असले तरी त्या दोहोत असलेला संबंध अमान्य करता येत नाही".५

'साहित्य' आणि 'संस्कृती' यांचा निकटचा संबंध आहे. साहित्य हा संस्कृतीचाच एक भाग आहे. संस्कृती म्हणजे विशिष्ट काळातील समाजातील जगण्याची विशिष्ट रीती, पद्धती, धाटणी होय.

संस्कृतीत सामावलेल्या कोणत्याही गोष्टीचे ज्ञान उपजत नसते. संस्कृतीचा वारसा पूर्वजांकडून मिळतो. परंतु प्रत्येक पिढी तेवढ्यावरच समाधान मानीत नाही. परिस्थितीशी समायोजन करताना व चिकित्सक बुद्धीने निर्माण केलेल्या प्रश्नांची उत्तरे शोधताना प्रत्येक पिढीला नवीन अनुभव येतो. नवनवीन संस्कृतीची निर्मिती होते. मूळ संस्कृतीत भर पडते. या प्रक्रियेमुळेच मानवी संस्कृतीचा सतत विस्तार होत आला आहे.

समाज विकसनशील आणि विस्तारशील आहे. संस्कृती हे या समाजाचे एक वैशिष्ट्य आहे. संस्कृतीसुध्दा विकसनशील आणि विस्तारशील असते. मानवी समाजाच्या सांस्कृतिक जीवनातील स्थिती गतीचा आलेख, निर्देश साहित्य कलांमधून प्रत्ययाला येऊ शकतो. मानवी समाजात संस्कृतीचे महत्व आहे. संस्कृती जोपासावी लागते. जोपासतानाच तिचे संवर्धन होते. साहित्य हे संस्कृतीची जोपासना करण्याचं, संस्कृतीचं रक्षण करण्याचं आणि संवर्धन करण्याचं कार्य करीत असते. समाज वास्तवाला साहित्यात अनन्यसाधारण महत्त्व असते. लेखक त्याने अनुभवलेले सामाजिक वास्तव आपल्या साहित्यकृतीतून मांडतो. त्यातून त्याच्या साहित्याला संदर्भ प्राप्त होत असतात. या संदर्भाच्या अभ्यासात साहित्य मार्गदर्शक ठरते. वरील संदर्भ लक्षात घेता लेखकाच्या सामाजिक जाणिवेचा, सामाजिक वास्तवाचा, समाज जीवनाचा, समाज परिवर्तनाचा, सामाजिक मूल्यांचा समाजातील वृत्ती-प्रवृत्तींचा, समाज आणि साहित्य यांच्या नात्यांचा आणि त्यातून समाज मूल्यांचा आविष्कार करावा अशी अपेक्षा लेखकाकडून केली जाते. सामाजिक बांधिलकीत लेखक हा व्यक्ती म्हणून समाजाचा घटक असतो. हा विचार लक्षात घेतलेला आहे.

लेखकाच्या साहित्य निर्मितीत त्याचे सारे व्यक्तीमत्व सामावलेले असल्याने साहित्याचा विचार करताना, त्याच्या व्यक्तीमत्वाचा विचार तितकाच महत्वाचा असतो. सामाजिक आणि सांस्कृतिक पर्यावरण हा सामाजिक घटक, वाङ्मयनिर्मीती आणि अभिरूची, सामाजिक आणि सांस्कृतिक पर्यावरणातच घडत असते. लेखक आणि वाचक हे समाजाचेच घटक असतात. ते ज्या समाजाच्या पर्यावरणात वावरतात त्या पर्यावरणाचा त्यांच्यावर चांगला- वाईट परिणाम होणे स्वाभाविक असते. शिवाय प्रत्येक समाजाची आपली

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-17, Issue-11(A)| November- 2025

म्हणून एक संस्कृती असते. या संस्कृतीची जडण घडण परंपरेने झालेली असते. समाजाच्या आचार-विचार, रूढी प्रथा यातून संस्कृतीला पैलू प्राप्त होत असतात. लेखक आणि वाचक याच सामाजिक, सांस्कृतिक पर्यावरणात वाढलेला असतो. त्यामुळे या समाजाच्या जीवनपध्दतीचे चित्रण त्याच्या साहित्यकृतीतून येणे जसे स्वाभाविक असते, तसेच ते वाचकालाही आपले वाटणे स्वाभाविक ठरते. काळ बदलला की सामाजिक आणि संस्कृतीत स्थिती बदलते. आणि बदलत्या स्थितीचा परिणाम साहित्यावरही झालेला दिसून येतो. स्वातंत्र्योत्तर काळानंतर दलित साहित्य, स्त्री साहित्य, इत्यादी साहित्य प्रकारात झालेला बदल हे काळाच्या सामाजिक आणि सांस्कृतिक बदलाचे उदाहरण आहे.

यावरून सामाजिक, सांस्कृतिक स्थिती बदलली म्हणजे साहित्यातूनही बदल घडून येतात, असे सिद्ध होते.

**समारोप**

समाज, संस्कृती आणि वाङ्मय यांच्यातील संबंध अतूट असल्याने त्यांचा परस्परांवर प्रभाव पडत असतो. समाजात परिवर्तन घडू लागले की, वाङ्मयातही त्याचे पडसाद स्वाभाविकपणे उमटतात आणि त्यातही परिवर्तन घडून येते. याच दृष्टीने आपल्याला असे म्हणता येते की. सामाजिक, सांस्कृतिक चळवळी आणि वाङ्मय यांचा परस्परांवर प्रभाव पडत असतो. मराठी साहित्य बाराव्या शतकापासून निर्माण झालेले असले आणि आपल्या साहित्याच्या या परंपरेचा आजच्या साहित्याशी व साहित्यविषयक वातावरणाशी संबंध असला तरी मराठी साहित्याच्या संदर्भात प्राचीन, अर्वाचीन हा भेद फार महत्वाचा आहे. या अर्वाचीन कालखंडात मराठी समाजाचा पाश्चात्य संस्कृतीशी जो संबंध आला त्या संबंधाचेच आपल्या आजच्या साहित्य संस्कृतीशी अधिक प्रभावी नाते असलेले आढळते.वरील सर्व विवेचनावरून असा निष्कर्ष निघतो की, साहित्य हे समाज आणि संस्कृतीच्या प्रभावातून निर्माण होणारी एक कला आहे. साहित्याचा अनुबंध राष्ट्र, जात, धर्म, वंश, प्रदेश इत्यादी दृष्टीने तपासला असता त्यातून समाजाचे व संस्कृतीचे प्रतिबिंब अनुभवता येते . साहित्याची भाषा ही दलित, ग्रामीण, अभिजात, आदिवासी इत्यादी दृष्टीने आधुनिक काळात बोलीरुप झालेली दिसते . त्यामुळे या सर्व साहित्यातून त्या – त्या बोलीच्या परंपरा, लोकतत्त्व आणि त्या - त्या समाज संस्कृतीचा आलेखच स्पष्ट होतो.

**संदर्भ ग्रंथ**

१) कऱ्हाडे सदा, ‘समाज आणि साहित्य’, लोकवाङ्मय गृह, मुंबई, आवृत्ती – तिसरी, मार्च -२००७, पृ. १३.
२) आपटे वा.गो., ‘ विस्तारित शब्दरत्नाकर’, वरदा प्रकाशन, पुणे, चौथे पुनर्मुद्रण- २०१४,पृ. ७३५.
३) राजाध्यक्ष विजया (संपा), ‘ मराठी वाङ्.मय कोश ( खंड- चौथा )’, महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई , प्रथमावृत्ती- नोव्हेंबर -२००२, पृ. ३८०.
४) उन्नि, ( कऱ्हाडे सदा), पृ. २.
५) डहाके वसंत, ‘मराठी साहित्य इतिहास आणि संस्कृती’, पॉप्युलर प्रकाशन, मुंबई, पुनर्मुद्रण – २००८, पृ. २४२.